<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.४</u>

<u>नि.फौ.ख.क्र.२९६/२०१९</u>
सरकार विरूध्द मोहम्म्द शरीक
निशाणी – ५१

मी शपथपूर्वक खरे सांगतो की

माझे नाव – श्रीकृष्ण उत्तमराव दाभणे
वय – अंदाजे ४६ वर्ष, व्यवसाय – एन.पी.सी. ब.नं.७२०८
राहणार – झिंगाबाई टाकळी, नागपूर

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. लूले यांच्या कडून**

दि.०६.०५.२०१९ रोजी मी गुन्हे प्रकटीकरण शाखेत कार्यरत होतो. त्यादिवशी माझी रात्रपाळी डयुटी होती. त्यावेळी आम्हाला माहिती मिळाली की ड्रॅगण पॅलेस पाठीमागे गाई बांधुन ठेवल्याचे कळविले. ती जागा मुस्लीम कब्रस्तान च्या पाठीमागे असल्याचेही कळाले होते. त्यामुळे आम्ही स्टाफसह त्या भागात गेलो. तेथे काही गाई बांधलेल्या मिळाल्या व काही पिकअप गाडीमध्ये ठेवल्या होत्या. त्या गाई आम्ही जमा केल्या व एका खाजगी गाडीने साईनाथ गौशाळेमध्ये पाठविल्या. तेथे एक वाहन चालक होता त्याला घेउन आम्ही मागच्या भागात गेलो. त्याला गाई कोठुन आणल्या याची विचारपुस केली. गाई कत्तलीसाठी नेणार असल्याचे आम्हाला कळाले. त्यादिवशी माझ्यासोबत एन.पी.सी. दुर्गे, पोहवा दिलीप कुंभरे, राहुल ठाकुर, एनपीसी मनोज चौधरी असे होते. तसेच ड्रॅगण पॅलेसचे बीट मार्शल हाडगे व शिपाई विष्णुरकर आमच्यासोबत होते. मी आरोपींना ओळखू शकतो, ते आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. शर्मा यांच्या मार्फत सुरू**

हे म्हणणे खरे आहे की दिवसपाळी व रात्रपाळी अश्या दोन शिफ्ट पोलिस ठाण्यात असतात. नवीन शिफ्ट मधील कर्मचारी रूजु होतेवेळी त्याची हजेरी होते. घटनेदिवशी मी रात्रपाळी डयुटीवर हजर होतो हे दाखविण्यासाठी अभिलेखावर कागद आहे का याची मला माहिती नाही. मी तसा कागद तपासी अधिका–याला दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी त्यादिवशी रात्रपाळी डयुटीवर नसल्याने मी तसा कागदोपत्री पुरावा दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी सरतपासात कथन केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की पोलिस ठाण्यात महिन्याला जनावरांचे केसेस दाखल करण्याबाबत कोटा पध्दत आहे. हे म्हणणे खरे नाही की महिण्याचा कोटा पुर्ण करण्यासाठी

आरोपीविरूध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला ओळखत असल्याचे खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी नाही.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2026.03.11 11:02:29 +0530

कामठी
दिनांक १०/०३/२०२६

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी